**<u>ठळक बातम्या</u>**

- आणीबाणीमध्ये मानवाधिकारांसाठीच्या लढ्यात प्राण अर्पण करणाऱ्या सर्वांना देशाची आदरांजली

- भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्लांचं फाल्कन नाईन रॅकेटमधून यशस्वी उड्डाण

- ऑपरेशन सिंधूमार्फत इस्राएलमधून आतापर्यंत ८१८ भारतीय सुखरुप मायदेशी परतले

- इसराएलने गाझामधे केलेल्या हल्ल्यात किमान ७० पॅलेस्टिनी ठार

**आणि**

- अँडरसन-तेंडुलकर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतला पहिला सामना भारताने गमावला

**<><><><><>**

संविधान हत्या दिवस आज पाळण्यात येत आहे. २५ जून १९७५ या दिवशी तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली होती. १९७५ मध्ये या दिवशी तत्कालीन राष्ट्रपती फखरुद्दीन अली अहमद यांनी अंतर्गत अशांततेच्या धोक्यांचा हवाला देत कलम ३५२ अंतर्गत आणीबाणीची घोषणा केली. वाढत्या राजकीय अशांतता आणि न्यायविषयक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आणीबाणीची घोषणा करण्यात आली. तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वातल्या सरकारने राज्यांचे अधिकार केंद्राच्या नियंत्रणाखाली आणले. या घोषणेनंतर संवैधानिक अधिकारांवर निर्बंध आले. राज्यघटनेच्या कलम १९ अन्वये भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकारावर गदा आली होती. त्यामुळे

वृत्तपत्रं तसंच इतर माध्यमांवर निर्बंध लादले गेले. या १८ महिन्यांच्या काळात मानवाधिकारांसाठीच्या लढ्यात प्राण अर्पण करणाऱ्या सर्वांना आजच्या संविधान हत्या दिनी आदरांजली वाहण्यात येत आहे. या निमित्तानं प्रत्येक भारतीयाच्या मनात वैयक्तिक स्वातंत्र्य आणि लोकशाहीची ज्योत तेवत राहते, तसंच हुकुमशाही प्रवृत्तींशी लढा देण्याची प्रेरणा मिळत राहावी याकरता हा दिवस गेल्या वर्षीपासून पाळला जातो.

आकाशवाणीच्या मन की बात या कार्यक्रमातून आपले विचार मांडताना प्रधानमंत्री मोदी यांनी आणीबाणी हा देशाच्या इतिहासातला सर्वात काळा अध्याय होता. या काळात लोकशाहीचं समर्थन करणाऱ्यांवर अत्याचार केले जात होते, असं मोदी आपल्या संबोधनात म्हणाले. आणीबाणी हा काँग्रेसच्या सत्तेच्या हव्यासापोटी चाललेल्या अन्यायाचा काळ होता. सत्तेची वाटचाल हुकूमशाहीच्या दिशेने सुरू झाली तर लोकशाहीत ती सत्ता उखडून टाकण्याची ताकद असते, याचं स्मरण करण्याचा आजचा दिवस असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आपल्या समाज माध्यमावर म्हटलं आहे.आणीबाणीच्या काळात नवीन नेतृत्वाची बीजं रोवली गेली आणि त्यातून नरेंद्र मोदी नावाचा नेता घडला याची कथा सांगणाऱ्या पुस्तकाचं प्रकाशन आज अमित शाह यांच्या हस्ते होणार आहे.

पन्नास वर्षांपूर्वी आणीबाणी लादून भारतीय लोकशाहीची गळचेपी करण्याचा एक निष्फळ प्रयत्न करण्यात आला होता. हे सत्तेच्या गैरवापराचं आणि हुकूमशाहीचं एक ज्वलंत उदाहरण असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आपल्या समाज माध्यमावर म्हटलं आहे. काँग्रेसने ५० वर्षांपूर्वी आणीबाणी लागू करण्यामागे असलेली हुकूमशाही मानसिकता अजूनही कायम असल्याची टीका भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी केली आहे.

<><><><><>

संविधान हत्या दिनानिमित्त मानवाधिकारांच्या मूल्यांचं संवर्धन करण्याच्या हेतूनं आज देशभरात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. २५ जून १९७५ हा दिवस भारतीय लोकशाहीसाठी सगळ्यात काळा दिवस असून अशा त्याची पुनरावृत्ती होऊ नये, म्हणूनच तो दिवस कायम लक्षात राहण्याची गरज आहे, असं प्रतिपादन महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज केलं. संविधान हत्या दिवसानिमित्त मुंबईत राजभवन इथं आणीबाणीत संघर्ष करणाऱ्यांच्या स्मरणार्थ आणि सन्मानार्थ आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या काळात देशाची लोकशाही वाचवण्यासाठी संघर्ष करणाऱ्या नागरिकांमुळेच आज भारत जगातली सर्वात मोठी लोकशाही म्हणून उभा आहे, असं त्यांनी सांगितलं.

आणीबाणी लागू करणं ही लोकशाहीची हत्या होती, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेली राज्यघटना संपवणारा तो काळा दिवस होता, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. या काळात लोकशाहीच्या सेनानींच्या लढ्यामुळे भारताची राज्यघटना आणि लोकशाही वाचली. आता भारताची लोकशाही इतकी प्रगल्भ आहे, की कुणीही कितीही प्रयत्न केला, तरी ती संपवू शकणार नाही, असंही फडणवीस यांनी नमूद केलं.

आणीबाणीच्या काळात देशाच्या लोकशाहीसाठी लढा देणाऱ्या सर्व ज्ञात-अज्ञात भारतीयांचा संघर्ष कायमच आपल्यासाठी प्रेरणादायी, ऊर्जादायी ठरेल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

यावेळी मान्यवराच्या हस्ते आणीबाणीच्या विरोधात लढा देणाऱ्यांचा सन्मानही करण्यात आला. विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, मंत्री मंगलप्रभात लोढा, आशीष शेलार, अशोक उइके आणि इतर यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांना घेऊन फाल्कन नाईन हे रॉकेट आज अंतराळात झेपावलं. अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था नासाच्या ॲक्सिऑम फोर या अवकाश मोहिमेला आज फ्लोरिडा इथे केनेडी स्पेस सेंटरवरून आज दुपारी बारा वाजून १ मिनिटाने प्रारंभ झाला. या रॉकेटमध्ये असलेल्या स्पेसएक्स ड्रॅगन या अंतराळयानातून चार अंतराळवीरांचं पथक आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या दिशेने प्रवास करत आहे. या मोहिमेचं नेतृत्व अमेरिकेचे कमांडर पेगी व्हिटसन करत आहेत. हंगेरीचे टिबोर कापू आणि पोलंडचे स्लावोस उझनान्स्की हे या मोहिमेतले तज्ञ आहेत. तर शुभांशू शुक्ला पायलट म्हणून काम पाहत आहेत.

यंदाच्या २९ मे रोजी हे उड्डाण नियोजित होतं. मात्र ही मोहीम तांत्रिक अडचणींमुळे आतापर्यंत अनेक वेळा पुढे ढकलण्यात आली होती. केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की, कॅप्टन शुभांशु शुक्ला या मोहिमेदरम्यान सूक्ष्म गुरुत्वाकर्षणाशी संबंधित सात प्रयोग करतील. यात किरणोत्सर्गाचा शैवालांवर होणारा परिणाम, अवकाशात बियाणं पेरणं अशा विविध प्रकारच्या प्रयोगांचा समावेश आहे.

<><><><><>

केंद्रीय अंतराळ राज्य मंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांचं अभिनंदन केलं आहे. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला भेट देणारे शुक्ला हे पहिले भारतीय ठरले आहेत. असं त्यांनी समाजमाध्यमावर लिहिलेल्या पोस्टमधे म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विविध सुधारणा झाल्यामुळे इसरोचं जागतिक स्तरावरचं काम वाढलं असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. ॲक्सिऑम फोर च्या यशस्वी उड्डाणाबद्दल सर्वत्र आनंद व्यक्त होत आहे.

<><><><><>

ऑपरेशन सिंधूमार्फत इस्राएलमधून आतापर्यंत ८१८ भारतीय सुखरुप मायदेशी परतले आहेत. केंद्रीय कामगार आणि रोजगार राज्य मंत्री शोभा करंदलाजे यांनी आज सकाळी इस्राएलमधून आलेल्या २२४ भारतीयांचं स्वागत केलं.

<><><><><>

इसराएलने गाझा मधे केलेल्या हल्ल्यात आज किमान ७० पॅलेस्टिनी मरण पावले. त्यातल्या अनेकांना मदत वेळेवर न मिळाल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. राफाच्या उत्तरेला शाकोश परिसरात अमेरिकेने चालवलेल्या मदत केंद्राजवळ जमलेल्या पॅलेस्टिनींवर इसराएली सैन्यानं गोळीबार केला. त्यात २५ जण जागीच ठार झाले आणि अनेक जण जखमी झाले. नुसेरत मधे अल- अवादा रुग्णालयाजवळ झालेल्या आणखी एका गोळीबाराच्या घटनेत १९ जण ठार झाले तर १४६ जण जखमी झाले. त्यातल्या ६२ जणांची स्थिती गंभीर आहे. गाझा शहराच्या दक्षिणेला वसलेल्या अल साबरा परिसरात इसराएलने एका घरावर केला. त्यात मरण पावलेल्यांचे १० मृतदेह बाहेर काढल्याचं गाझाच्या नागरी संरक्षण दलाने सांगितलं. इस्राएलने मात्र अद्याप या हल्ल्यांबद्दल अधिकृत निवेदन दिलेलं नाही.

<><><><><>

कैलाश मानसरोवर यात्रेकरूंच्या दुसऱ्या तुकडीने आज सकाळी नाथु ला सीमा यशस्वीरित्या पार केली. या तुकडीमध्ये ४७ यात्रेकरूंचा समावेश आहे. गंगटोक मधल्या वास्तव्यामध्ये यात्रेकरूंना पुरवण्यात आलेल्या व्यवस्थेबद्दल यात्रेकरूंनी एसटीडीसी आणि सिक्कीम सरकारचे आभार मानले.

<><><><><>

अँडरसन-तेंडुलकर करंडकाच्या हेडिंग्ले इथं झालेल्या पहिल्या क्रिकेट कसोटीमध्ये इंग्लंडनं भारतावर ५ गडी राखून विजय मिळवला आहे. कालच्या पाचव्या दिवशी इंग्लंडनं बेन डकेटच्या १४९ तसच झॅक क्रॉली आणि ज्यो रूट

यांच्या अर्धशतकाच्या जोरावर ३७१धावांचं आव्हान सहज पार केलं. दुसरी कसोटी २ जुलै पासून बर्मिंगहॅम इथं सुरू होणार आहे.

//<><><><><>//